गोदरेज इंडस्ट्रीज लि.

# सुरक्षा आणि आरोग्य धोरण

गोदरेज इंडस्ट्रीज लि. कंपनीला विश्वास आहे की आमच्याकडे भागधारकांसाठी सर्वश्रेष्ठ तसेच अखंड सुरक्षितता आणि आरोग्य संबधित धोरण आहे. आम्ही आमच्या भागधारकांना सर्वोत्तम तसेच आरोग्यदायी वातावरण पुरविण्यास कटिबद्ध आहोत.

या सा-यात गोदरेज कंपनीचे कर्मचारी व्यावसायिक सहयोगी, कंत्राटदार, उप कंत्राटदार, विक्रेता, वाहतूकदार, ग्राहक, आणि सभोवताली असलेला समाज अंतर्भूत करतो.

## मजबूत संघटनात्मक संस्कृती

- आम्ही आमच्या सर्व व्यावसायिक योजना आणि प्रकिये मध्ये अखंडित सुरक्षितता आणि आरोग्यदायी धोरण अवलंबून मजबूत सुरक्षितता आणि आरोग्यदायी संस्कृती स्विकारतो.
- आमच्या येथील कर्मचारीवर्ग कामगार, बांधकाम, स्थापत्य इमारतीमधील बदल आणि दुरुस्ती विभाग, यंत्रसामुग्री, उपकरणे आणि इतर मालमत्तासाठी, सुरक्षितता आणि आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक गोष्टींची अंमलबजावणीची खात्री करून घेतो.
- गोदरेज इंडस्ट्रीज लि. च्या सर्व कर्मचा-यांना सुरक्षितता आणि आरोग्य बाबतीत प्रशिक्षण तसेच ज्ञान देऊन प्रोत्साहित करतो आणि सर्व भागधारकांना सुरक्षा आणि आरोग्य व्यवस्थापन कार्यक्रमात सहभागी करून त्यांचे विचार, मूल्य, जाणून घेतो.

## सातत्यपूर्ण सुधारणा

- आम्ही आमच्या कार्य आणि प्रकिये मध्ये प्रगत तंत्रज्ञान आणि टिकाऊ अखंडित नियोजनाचा वापर करून जोखीम कमी करतो तसेच जोखीम संबंधित व्यवस्थापनाचे कार्यक्रम राबवून सुरक्षा आणि आरोग्याच्या कामगिरीवर लक्ष देतो.
- आम्ही आमच्या बाह्यसंस्था, तज्ञ व्यक्ती, उच्चविचारी संस्थाशी संलग्नता ठेवून, मूल्यांकन, कारवाई ह्यांचे व्यवस्थापन आणि सातत्यपूर्ण प्रगतशील कल्पनांचा वापर करीत आहोत.
- सुरक्षा आणि आरोग्य विषयक मोजमाप निरीक्षण बाबतीत ठसा उमटवण्यासाठी आम्ही आमच्या कामगिरीत सातत्य ठेवतो

## अनुपालन

- आम्ही आमच्या कामामध्ये आपल्या देशांतर्गत आणि राज्यांतर्गत अवलंबिलेल्या सुरक्षा आणि आरोग्य निगडित सर्व कायदा, नियम व नियमनांचे पालन करतो.
- आम्ही आमच्या, भागधारकांच्या गरजा भागवताना उत्पादनांच्या योजना, सुधार, उत्पादन, हाताळणी, साठवण आणि वाटप करताना कमीत कमी मनुष्य तसेच वातावरणाची हानी होणार नाही ह्याची काळजी घेतो.

" संपूर्ण कंपनीच्या सभोवताली मजबूत तसेच टिकाऊ सुरक्षा आणि आरोग्यदायी संस्कृती टिकून रहावी हिच आमची दूरदृष्टी "

गोदरेज इंडस्ट्रीज च्या सर्व उत्पादन विभाग, संशोधन आणि विकास विभाग, पायलट प्लांट आणि कार्यालये ह्या सर्वांना सदर " सुरक्षितता आणि आरोग्य धोरण " बंधनकारक राहील.

दिनांक :- २३ जुलै २०१९

नितीन एस. नाबर
( कार्यकारी संचालक आणि अध्यक्ष )
गोदरेज इंडस्ट्रीज लि.
(केमिकल्स)